जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक -३२३ दिनांक - १४/०८/२०२४**

गुन्हे शाखा,खंडणी विरोधी पथक १ पुणे शहर

## बेकायदेशीर रित्या पिस्टल बाळगणा-या रेकॉर्डवरील गुन्हेगारांकडून २ पिस्टल व ४ जिवंत काडतुसे जप्त

दि. १२/०८/२०२४ रोजी खंडणी विरोधी पथक १, गुन्हे शाखा, पुणे शहर कडील अधिकारी व अंमलदार असे पेट्रोलिंग करीत असताना पोलीस अंमलदार मयूर भोकरे,अमोल आवाड यांना त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एक इसम कोंबडी पुल, मंगळवार पेठ पुणे येथे पिस्टल बाळगून थांबला असल्याची माहिती मिळाली.

त्याबाबत वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तेथे जाऊन सापळा रचून संशयित इसमास शिताफीने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या इसमास त्याचे नाव व पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **बॉबी भागवत सुरवसे, वय २८ वर्षे, रा. सर्वे नं १२, लक्ष्मीनगर, येरवडा, पुणे** असे असल्याचे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या कंबरेला पाठीमागे १ देशी बनावटीचे पिस्टल व २ जिवंत काडतुस मिळून आल्याने सदर आरोपी विरूद्ध फरासखाना पो स्टे गु.र.नं. १६२/२०२४ आर्म ॲक्ट ३(२५) सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) सह १३५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर आरोपीकडे अधिक तपास केला असता त्याने त्याच्याकडील आणखी १ पिस्टल व २ जिवंत काडतुसे वैभव कोलते रा. पिसर्वे, ता. पुरंदर, जि पुणे यास विकले असल्याचे समजल्याने इसम नामे **वैभव चंद्रकांत कोलते, वय ३२ वर्षे, रा. मु पो पिसर्वे, ता. पुरंदर, जि. पुणे** याच्याकडून १ देशी बनावटीचे पिस्टल व २ जिवंत काडतुस जप्त करण्यात आलेले आहेत. दोन्ही आरोपींना गुन्हयात अटक करण्यात आली आहे.पुढील तपास सपोनि अभिजीत पाटील, खंडणी विरोधी पथक १, गुन्हे शाखा, पुणे शहर हे करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.निखील पिंगळे, मा. सहा पोलीस आयुक्त १, गुन्हे शाखा गणेश इंगळे, यांच्या मार्गदर्शन व सुचनेनुसार खंडणी विरोधी पथक १, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.शैलेश संखे, सहा.पोलीस निरीक्षक विजयकुमार शिंदे, सपोनि अभिजीत पाटील, पोलीस अंमलदार मयुर भोकरे, अमोल आवाड, नितीन कांबळे, दुर्योधन गुरव, राजेंद्र लांडगे, सयाजी चव्हाण, प्रफुल्ल चव्हाण, अमर पवार, रविंद्र फुलपगारे, मधूकर तुपसौंदर, प्रविण ढमाळ, गितांजली जांभुळकर यांनी कारवाई केली आहे.